जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सिंधुदुर्ग
( महसूल शाखा )
मुख्य प्रशासकीय इमारत पहिला मजला, ओरोस - सिंधुदुर्गनगरी ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग पिन.416812
दुरध्वनी क्र. 02362 - 228856 ईमेल - rbsindhudurg@gmail.com

Pr. CEO (V.P.)

REV-CRZ/"e"sunavani/09/2020 Date 07.09.2020

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद
मध्यवर्ती टपाल नोंदणी कक्ष (CRC)
क्र. 155315
22 SEP
V.P.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
23 9 2020
34

विषयः- सिंधुदुर्ग जिल्हयाच्या प्रारुप किनारा व्यवस्थापन आराखड्यांवरील (CZMPs) जनसुनावणी बाबतची सुचना ...

मा.अवर सचिव पर्यावरण यांचेकडील पत्र NO.MCZMA-2019/CR-47/TC-4 दिनांक 17.03.2020 अन्वये दि.27.03.2020 रोजी आयोजीत करणेत आलेली सुनावणी कोरोना महामारीचे विषाणु उद्रेकामुळे स्थगित करणेत आलेली होती. सदरील सुनावणी संचालक व सदस्य सचिव पर्यावरण विभाग, MCZMA यांचेकडील दि.25.08.2020 रोजीचे पत्रान्वये दिनांक 28 सप्टेंबर 2020 रोजी डिजीटल प्लॅटफॉर्म (digital platform) द्वारे घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांवरील (CZMPs)जनसुनावणी डिजीटल प्लॅटफॉर्मवर घेणेत येणार आहे. त्याकरिता लाईव्ह सुनावणीमध्ये सोमवार दिनांक 28 सप्टेंबर 2020 रोजी सकाळी 11.00 वाजता सहभागी होता येईल.सदरील सुनावणी मध्ये सहभागी होणेकरिता लिंक (link) दिनांक 25 सप्टेंबर 2020 रोजीचे वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणेत येईल.याबाबतची प्रसिध्दी स्थानिक वर्तमान पत्रामध्ये करणेत आलेली आहे. तसेच ग्रामपातळीवर सदर जनसुनावणीबाबतची प्रसिध्दी होणेकरिता या कार्यालयाची https://sindhudurg.nic.in या संकेतस्थळावरदेखील प्रसिध्द करणेत येणार आहे. याबाबतची जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली असून आपले कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले अधिनस्त संबंधीत गटविकास अधिकारी कार्यालये, ग्रामपंचायत कार्यालय याचेकडे व्यापक प्रसिध्दी करणेकरिता जाहीर नोटीस यासोबत पाठविणेत येत आहे. आपले कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले अधिनस्त संबंधीत गटविकास अधिकारी कार्यालये, ग्रामपंचायत कार्यालय यांचेकडे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

A

(मा.जिल्हाधिकारी महोदय यांचे सुचनेनुसार)

(शुभांगी साठे )
निवासी उपजिल्हाधिकारी,
सिंधुदुर्ग

Dy CEO VP
Let it done
as A
brief
18/9